**<u>नि.नं. १२४ खालील आदेश</u>**
(दि.३०.०८.२०२५ रोजी पारीत)

**१.** वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता (येथून पुढे '**संहिता**') आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दिलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, दिवाणी अपिल नं.३४९/२०१३ मधील न्यायनिर्णयानुसार याच दाव्यामध्ये पुर्वी दिलेला न्यायनिर्णय हा रद्द करण्यात आला असुन सदरचा दावा पुन्हा फैलावर घेण्यात आला आहे. वादीचे पुढे असे कथन आहे की, सदर आदेशाप्रमाणे मोजणी झाली असुन त्याच्या दाखल झालेल्या अहवालावरुन दावा मिळकतीचा मुळ स.नं.२०/१ असा होता व एकत्रीकरणामध्ये त्याला गट क्र.२२ देण्यात आला होता. तसेच, एकत्रीकरण योजनेपुर्वी स.नं.२०/१ मधुन पाथर्डी–बोधेगाव रोड गेला होता. वादीचे पुढे असे कथन आहे की, स.नं.२०/१ मधील २० आर इतके क्षेत्र रस्त्यासाठी संपादीत झाले असुन गट नं.२२ चे क्षेत्र पाथर्डी–बोधेगाव रस्त्याच्या पश्चिम व पुर्व बाजुला आहे. सदर रस्त्याच्या पश्चिम बाजुचे क्षेत्र हे वाद मिळकत असुन ते वादीचे आहे, तसेच, पाथर्डी–बोधेगाव रस्त्याच्या पुर्वीकडील ४७ आर क्षेत्र हे गट क्र.२२ च्या सहधारकाचे आहे.

**२.** वादीचे पुढे असे कथन आहे की, मो.र.नं ३३०/२०२२ मधील मोजणी नकाशामध्ये वरील बाबी नमुद आहेत परंतु सदर बाबी या मुळ दाव्यामध्ये नमुद नसल्याने त्या नमुद करणे गरजेचे आहे. वादीने दावा परिच्छेद २ मध्ये पान नं.३ मधील ओळ क्र.१६ नंतर नवीन परिच्छेद वर नमुद केल्याप्रमाणे दुरूस्त करुन नमुद करण्यास विनंती केली असुन सदर दुरूस्ती मुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नसल्याने व न्यायनिर्णयास मदत होणार असल्याने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**३.** प्रतिवादींतर्फे प्रस्तुत अर्जाला म्हणणे देण्यात आले असुन सदरचा अर्ज हा खोटा, लबाडीचा व बेकायदेशीर असुन पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न असल्याने नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे. तसेच, सदर दुरूस्ती ही दाव्याचे स्वरुप बदलणारी असुन अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी प्रतिवादींची विनंती आहे.

**४.** प्रकरणातील विचाराधीन मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसासहित खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असल्याने वादाच्या गुणदोषावर निकालाकरीता आवश्यक आहे काय ? | – ***होकारार्थी*** |
| २. | प्रस्तावित दुरुस्ती मंजूर करणे आवश्यक आहे काय ? | – ***होकारार्थी*** |
| ३. | काय आदेश ? | – ***अर्ज मंजुर करण्यात येतो*** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ बाबतः**

**५.** वादीच्या वतीने सुविद्य विधिज्ञ श्री. एन. बी. जायभाय यांनी असा युक्तीवाद केला की, सदरची दुरुस्ती ही दाव्याचे स्वरुप बदलत नाही तसेच त्यामूळे कोणतीही नविन बाब समोर आणलेली नाही. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, सदरची दुरूस्ती ही प्रकरणाच्या योग्य न्यायनिर्णयाकरीता गरजेची असुन त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदरचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली.

**६.** प्रतिवादींतर्फे सुविद्य विधिज्ञ श्री. ए. एन. पठाडे यांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा अर्ज हा दाव्याच्या सुनावणीच्या वेळी दाखल केला असल्याने व तो खोटा व बेकायदेशीर असल्याने दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार असल्याने तो फेटाळण्यात यावा.

**७.** अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने वाद मिळकतीतील अतिक्रमणाचा ताबा मिळण्याकरीता दाखल केला आहे. दोन्ही बाजुची कथने व कागदपत्र यांचे अवलोकन केले. सदर अवलोकनामध्ये प्रस्तुत दाव्याचा न्यायनिर्णय दि.१९/१०/२०१३

रोजी होऊन सदरचा दावा हा खारीज करण्यात आला असल्याचे दिसुन येते. सदर दाव्याच्या न्यायनिर्णयाविरुध्द वादीने दाखल केलेले दिवाणी अपिल क्र.३४९/२०१३ मधील न्यायनिर्णयानुसार प्रस्तुतचे अपिल मंजुर करुन सदरचा दावा हा पुन्हा मोजणी करुन गुणदोषावर निकाली करण्यात यावा असे आदेश दिले असल्याचे अभिलेखावरुन दिसुन येते.

८. सदरचा दावा वर नमुद अपिलाच्या आदेशानंतर फैलावर घेण्यात आल्याचे व निशाणी–८९ वरील आदेशाप्रमाणे उपअधिक्षक भुमिअभिलेख पाथर्डी यांना तज्ञ मोजणीदार म्हणुन नेमुण मोजणीचा आदेश करण्यात आल्याचे व त्याप्रमाणे निशाणी–९५ कडे मोजणी होऊन प्रकरण व नकाशा दाखल करण्यात आला असल्याचे दिसुन येते. सदर नकाशावरुन वादीच्या कथनाप्रमाणे मधोमध रस्ता गेला असल्याचे कथनास पुष्टी मिळते.

९. तसेच, वादी व प्रतिवादी या दोघांनाही उलटतपासाची उचित संधी उपलब्ध होणार असल्याने दोघांनाही सदर दुरूस्तीमुळे कोणतीही बाधा येणार नाही. वादी प्रस्तुत दुरूस्तीद्वारे कोणतीही नवीन वस्तुस्थिती वाढवू इच्छीत नाही. प्रस्तूत दाव्यामध्ये अपिलातील निकालानंतर प्रकरण गुणदोषावर निकाली करणे असल्याने पुन्हा सुनावणी घेणे क्रमप्राप्त आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रकरण जरी पुराव्याकरीता असले तरी वादी पुर्वी मोजणीकरीता अर्ज व त्या अनुषंगाने अभिलेखावर आलेली परिस्थिती पुर्वी विनाविलंब अभिलेखावर आणु शकला नसता, त्यामुळे प्रस्तुत दुरूस्ती ही दाव्याच्या या टप्प्यावर देखील विचारत घेता येईल. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होत नाही. सदर दुरुस्ती प्रतिवादींना कोणत्याही स्वरुपात बाधक नाही. वरील विवेचनावरुन माझे मते प्रस्तावित दुरुस्ती मंजूर करणे उचित आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.३ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहेः

## <u>आदेश</u>

१. अर्ज नि.नं.१२४ विधिसेवा प्राधिकरणास रक्कम रुपये २००/–

कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तावित दुरुस्ती आजपासून १४ दिवसाचे आत दाव्यामध्ये करून दाव्याची दुरूस्त प्रत दाखल करावी व मुद्रांक शुल्क भरावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

SHIRISHKUMAR DIGAMBAR WAGHMARE
c=IN, o=BOMBAY HIGH COURT,
2.5.4.20=27258b50725b8ad0f02b93c79864217287a311295d93b8bfdb3e0b1ef7505488,
ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950294,
postalCode=400001, st=Maharashtra,
serialNumber=a141e942a1599350c9e218a76b562e7b4a7f83f2030ebfe78fa3c19c2f168be2,
cn=SHIRISHKUMAR DIGAMBAR WAGHMARE
2025.08.30 17:36:48 +05'30'

**दि.३०/०८/२०२५.** **( शिरीषकुमार दि. वाघमारे)**
**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पाथर्डी.**

मी प्रमाणित करतो की, या पीडीएफ फाईलमधील मजकूर व मुळ न्यायनिर्णयामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | श्रीमती. एम. आर. सानप, |
| न्यायालयाचे नांव | शिरीषकुमार दि. वाघमारे,<br>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट क्र. २,<br>पाथर्डी, जि. अहमदनगर. |
| न्यायनिर्णय दिनांक | ३०.०८.२०२५. |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | ३०.०८.२०२५. |
| न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख | ३०.०८.२०२५. |